"जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या मराठी ग्रामीण कवितेचा चिकित्सक अभ्यास "

विशेष संदर्भ : इ. स. **2000** ते इ. स. **2020**

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत

मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा

संक्षिप्त आराखडा

संशोधक

श्री.सोपान व्यंकटराव पावडे

एम . ए . (मराठी)बी.एड.नेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.श्रीराम गोविंद गव्हाणे

एम.ए . (मराठी) नेट.पीएच.डी.

मराठी विभागप्रमुख,लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, जि.नांदेड.

जून २०२३

प्रस्तावना :

१९९० चा कालखंड म्हणजे जागतिक परिवर्तनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी नव्या जागतिक अर्थव्यवस्थेची मांडणी केली आणि १९९१ नंतर जागतिकीकरण या संकल्पनेचा जन्म झाला. जागतिकीकरण या संकल्पनेचा विस्तार होत असताना आपला भारत देश नेमका याचवेळी आर्थिक संकटात सापडला. ६० कोटी डॉलरचे कर्ज घेताना ६७ टन सोने जागतिक सावकाराकडे गहाण ठेवावे लागले.त्याचा परिणाम म्हणून गॅट करारावर सही करण्यात आली जागतिकीकरणामुळे सेवा सुविधा मिळतील, अर्थव्यवस्था सुदृढ होईल.असा प्रचार आणि प्रसार केला गेला,मात्र तिसऱ्या जगाचे नेतृत्व करणारा नेहमी तटस्थतेची भूमिका घेणारा आपला भारत देश शेवटी भांडवलशाहीला शरण गेला. त्याचे दुष्परिणाम शेती, लघुउद्योग, नैसर्गिक संपत्ती बरोबर सर्व क्षेत्रावर झाले.

भारत सरकारने १९९१ साली गॅट कराराच्या माध्यमातून खुल्या अर्थव्यवस्थेसाठी भारताची अर्थव्यवस्था खुली केली. व्यापाराची समानसंधी, सुधारित करप्रणाली आणि मुक्त व्यापार धोरणाचे नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक देशाचे छोटेउद्योग संपुष्टात आणले.जागतिकीकरणाचा परिणाम समाजातील आर्थिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक,राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात देखील पडत गेला. परिणामी जागतिकीकरणाचा परिणाम साहित्यावर झालेला आहे . साहित्य हा समाजाचा आरसा असतो,समाजात होणाऱ्या बदलाचे पडसाद साहित्यावर उमटत असतात.भारतीय व्यवस्था आणि समाजातील अनेक घटकावर त्याचा थेट परिणाम झाला. मराठी साहित्यात या सर्व परिणामाचे चित्रण कथा, कविता, कादंबरी, नाटक व वैचारिक लेखनातून येताना आढळते.भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था पूर्णत: शेतीवर अवलंबून आहे.या सर्व व्यवस्थेतून खोलवर झालेले परिणाम सामाजिक बदलास कारणीभूत ठरले आहेत. सामाजिक, आर्थिक प्रश्न, शेती व शेतीशी जोडून प्रश्न,समग्र ग्रामीण जगणे व जीवनातील या प्रश्नांमधून निर्माण होणाऱ्या व्यवस्थेनी शेती, शेतकरी यांच्या पुढे अनेक प्रश्न निर्माण झाले. या पीएचडी संशोधनासाठी **2000** ते **2020** हा कालावधी ग्रामीण कवितेच्या अभ्यासासाठी निवडला आहे. या कालखंडातील मराठी ग्रामीण कविता, तिच्यातील बदल आणि वेगळेपणासह विविधांगी या कवितेचा अभ्यास या संशोधनातून होणार आहे.

जागतिकीकरणाचा परिणाम समग्र साहित्यावर झाला आहे. कवितेच्या संबंधाने इथे अभ्यास करावयाचा आहे. मराठी ग्रामीण कविता ही इ.स.२००० ते २०२० या कालावधीत कशी बदलत गेली. त्यामध्ये नवे प्रश्न, समस्या आणि सामाजिक वास्तवाचे दर्शन या कालखंडातील कवी कसे आधोरेखित करतात हे प्रामुख्याने अभ्यास करावयाचा आहे. उदा.ना.धों.महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजीत भालेराव, अजय कांडर, श्रीकांत देशमुख, जयराम खेडेकर, केशव सखाराम देशमुख, प्रकाश होळकर, ऐश्वर्य पाटेकर, केशव खटींग, श्रीराम गोविंद गव्हाणे, कल्पना दुधाळ, अमृत तेलंग, संदीप जगदाळे, नामदेव कोळी, रवी कोरडे, एकनाथ पाटील, धनाजी घोरपडे, संतोष पद्माकर पवार,संदीप जगताप, प्रकाश किनगावकर,प्रकाश मोगले यासह इतर काही महत्त्वांच्या कविंचे कवितासंग्रह सदर कालावधीतील एकत्रित अभ्यास या शोधप्रबंधात करावयाचा आहे.एकुण जागतिकीकरणाचे परिणाम व बदलत्या समाजजीवनाबरोबर बदललेल्या ग्रामीण कवितेचा अभ्यास हा मुख्य हेतु आहे.

संशोधन विषयाची गरज व महत्व:

जागतिक पातळीवर जागतिकीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. जागतिकीकरणाचा परिणाम सर्व क्षेत्रावर पडलेला आहे त्या अनुषंगाने मराठी साहित्यावर देखील जागतिकीकरणाचा परिणाम पडलेला आहे. १९९० च्या साहित्य प्रकारात विशेषत: कथा, कादंबरी आणि कविता यावर जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. आधुनिकतेची ओळख कवितेत दिसून येते. जागतिकीकरणाचा परिणाम कवितेवर पहावयास मिळते. म्हणून प्रस्तुत विषयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१)जागतिकीकरण संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे.

२)जागतिकीकरणाचे महत्त्व विशद करणे.

३)मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे.

४)मराठी ग्रामीण साहित्य व जागतिकीकरणाचा संबंध समजावून घेणे.

५)जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

६)जागतिकीकरणामुळे मराठी ग्रामीण कवितेच्या भाषेवर झालेल्या परिणामाची परिणामकारकता तपासणे.

गृहीतकृते/ गृहीतक:

१)जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव दिसून येतो.

२)जागतिकीकरण आणि मराठी साहित्याचा खूप जवळचा संबंध आहे.

३)जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात अनेक बदल घडून आलेले दिसतात.

संशोधन पद्धती:

संशोधन कार्यामध्ये संशोधन पद्धतीला अतिशय महत्त्व असते प्रत्येक क्षेत्रातील संशोधनासाठी काही ठराविक संशोधन पद्धती अवलंब केल्या जातात. साहित्याचे संशोधन करताना एकच एक संशोधन पद्धती न वापरता संशोधन विषयानुषंगाने उपयोगात येणारे संशोधन पद्धती अवलंबवावी लागते. म्हणून एकूणच या संशोधनकार्याची व्याप्ती लक्षात घेता संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्याचे ठरविले आहे. प्रस्तुत संशोधन हे मराठी ग्रामीण कवितावर असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धती संयुक्त राहणार आहे. या पद्धतीमुळे जागतिकीकरण या संकल्पनेचा अभ्यास करता येईल त्याचबरोबर जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण साहित्यावर झालेला परिणाम व प्रभाव अभ्यासता येईल.

संशोधनाची साधने:

प्रस्तुत संशोधन पूर्ण होण्यासाठी वेगवेगळ्या साधनसामग्रीचा उपयोग करायचा आहे. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य संदर्भात लेखन झालेले विविध ग्रंथ, विविध शोध प्रबंध, नियतकालिके,शब्दकोश,लेख,मासिके,वर्तमानपत्रे,इ.चा संदर्भाप्रमाणे उपयोग केला जाणार आहे.

शोध प्रबंधाची प्रकरणानुसार मांडणी:

प्रकरण पहिले : जागतिकीकरण आणि मराठी साहित्य संकल्पना व पार्श्वभूमी :

मागच्या अडीच तीन दशकापासून जागतिकीकरण हा विषय सर्वार्थाने चर्चिला जात आहे प्रस्तुत विषयात वांग्मयीन संस्कृती स्थित्यंतरांचा विचार करता येईल असे नाही तर सामाजिक राजकीय आणि साहित्य क्षेत्रासह सर्वच क्षेत्र या विषयाने प्रभावित झाले आहे.जागतिकीकरणाने आपल्या समग्र अशा संस्कृतिक आकृतीबंधाला नवा आकार दिल्यामुळे एका नव्या संस्कृतीचा उदय झाला आहे ही संस्कृती तंत्रज्ञानाने व्यापलेली असल्यामुळे आपली संस्कृतीक वैविध्य आणि भाषा व साहित्य व त्याचा मोठाच परिणाम झाला आहे या परिणामाची चर्चा यापूर्वीही खूप

मोठ्या प्रमाणात आणि वेगवेगळ्या माध्यमातून होत आली आहे विशेषतः साहित्य क्षेत्रात तर ही चर्चा विविध अंगी स्वरूपाची राहिली आहे तरीही या प्रभावाने अनेक पैलू दुर्लक्षितच आहेत. इ स 2000 ते 2020 या कालावधीतील कवींच्या कवितेतून जागतिकीकरणांमध्ये दिसून येणारे परिणाम याविषयीचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करावयाचा आहे एकूण जागतिकरणाचे परिणाम व बदलत्या समाज जीवनाबरोबर बदललेल्या ग्रामीण कवितेचा अभ्यास हा मुख्य हेतू या संशोधनाच्या पाठीमागचा आहे.

प्रकरण दुसरे : इसवी सन 2000 ते 2020 या कालखंडातील ग्रामीण कविता संकल्पना व स्वरूप

जागतिकीकरणाचा परिणाम समग्र साहित्य वर झाला आहे कवितेच्या संबंधाने येथे अभ्यास करावयाचा आहे मराठी ग्रामीण कविता ही इसवी सन 2000 ते 2020 या कालावधीत कशी बदलत गेली त्यामध्ये नवे प्रश्न समस्या आणि सामाजिक वास्तवाचे दर्शन या कालखंडातील कवी कसे अधोरेखित करतात हे प्रामुख्याने अभ्यास करावयाचा आहे उदाहरणार्थ नादू महानोर विठ्ठल वाघ इंद्रजीत भालेराव अजय कांदळ श्रीकांत देशमुख जयराम खेडेकर केशव सखाराम देशमुख प्रकाश होळकर ऐश्वर्या पाटेकर केशव कटिंग श्रीराम गोविंद गव्हाणे कल्पना दुधाळ अमृत तेलंग जगदाळे यादी कवींचा जागतिकीकरणाचा साहित्य क्षेत्रात झालेला परिणाम प्रस्तुत प्रकरणात याविषयीचा सर्वांगाने अभ्यास करायचा आहे.

प्रकरण तिसरे : जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर पडलेला प्रभाव :

भाषा मुळात प्रगल्भ असते म्हणून तिच्यात लोक लिहीत नाहीत उलट लोक महत्त्वाच्या गोष्टी त्या भाषेत लिहितात म्हणून भाषा प्रगल्भ होते. जागतिकीकरणामुळे अनेक नवीन विषय चिंतेचेही आणि आनंदाचे ही आपल्या आयुष्यात आले आहेत ते विषय हाताळून जोमाने साहित्य निर्मिती झाली तर वाचकांना ही रस वाटेल वाचक मिळाले तर मराठी लेखकांना ग्रुप वाटेल आणि या प्रगती चक्रात आपल्या भाषेची भरभराट होईल विंदा करंदीकरांची कविता ऐकून मा. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना मराठी भाषा शिकावी वाटते याचा अर्थ असा की श्रेष्ठ अभिव्यक्ती ही उत्कंठावर्धक साहित्या जशी गती देते तशी ती भाषेला नवा वाचक वर्गही जोडते..

शिक्षण, शेती, संगणक, जग, कुटुंब, नोकरी, मुले, स्त्री- पुरुष आणि इतरही विषयासहित साहित्य हे परिवर्तनाचे माध्यम म्हणावे. मराठी साहित्य परिवर्तनाचे शस्त्र व शास्त्र बनावे अशा दृष्टिकोनाने लिहिण्यासाठी आहे असे नाही. स्वत: सुखाय या दृष्टीने ती लिहिली जाऊ शकते. म्हणून तर अनुदिन्याचे पेव फुटले आहे. इतक्या चांगल्या अनुदिन्या आज अंतर्गत जालावर आहेत की,

तुम्ही फक्त वाचत राहावे अगोदर वाचू यात नंतर लिहू यात ही भूमिका घ्यायला लागलो तर आपण फक्त वाचतच राहू. इतके सगळे साहित्य आज आंतरजालावर म्हणजेच इंटरनेटवर आहे. हा जागतिकीकरणाचा साहित्यावर झालेला परिणाम आहे. आज आपण जगाच्या कानाकोपऱ्यातून इथे जमतो ही बाब ही सकारात्मक आहे.

प्रकरण चौथे जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कवितांचे वांग्मय मूल्यमापन

जागतिकीकरणामुळे साहित्य निर्मितीवर परिणाम होतो आहे माणसाची अभ्यासाचे क्षेत्र वाढले आहे. पूर्वीच्या माणसाने जे वाचले नसेल ती आता सहज वाचायला मिळते आहे.हातर जागतिकरणाचा फायदाच म्हणावा लागेल बरेचसे ब्लॉग वाचनीय असतात पण ते सगळे वाचून आपण साहित्य निर्मिती करणे म्हणजे मग खूपच वेळ लागेल भलेही ई- साहित्य लिहिणारे खूप विचार करत नसतील किंवा त्यांचे लेखन वर वाटणारे असेल पण; त्यांच्या साहित्यातून दैनंदिन जीवनात घडणाऱ्या गोष्टी डोकावतात ज्या समाजात ते राहतात वावरतात त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून दिसते आणि ते अपरिहार्य आहे.

साहित्य लोकाभिमुख व्हावे असा घोष चक्रधरांच्या काळापासून ऐकू येत आहे मध्यंतरी ह्या घोषाचा अर्थ साहित्य विकले जावे असा प्रकाशकांनी केला आता अनुदिन्या आणि संकेतस्थळावर स्वयखुशीने फुकट लिहिणाऱ्यांमुळे साहित्य वाचले जावे असा अर्थ होतो एवढेच ह्या बदलाचा संबंध जागतिकीकरणाशी कमी आणि माध्यमांच्या उपलब्धतेची जास्त आहे समजा जागतिकरण झाले नसते आणि मराठी वृत्तपत्रांची पाक्षिकांची साप्ताहिकांची संख्या वाढली असती तरीही हे झाले असते असे वाटते

प्रकरण पाचवे : उपसंहार :

वरील प्रकरणांच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील नव्हे तर समग्र भारतातील लोकजीवन समृद्ध झालेले आहे. त्याचे चित्रण साहित्यातून उमटले पाहिजे. मराठी साहित्याची उंची वाढली पाहिजे. मराठी जीवनाच्या विविध परिघांना स्पर्श करण्यासाठी मराठी लेखकांचे अनुभव विश्व समृद्ध झाले पाहिजे. जागतिकीकरणानंतर साहित्याचे विषय बदलत आहेत तीव्र संघर्ष आणि जगण्याची विलक्षण गती यामुळे जीवनातील फरपट वाढत आहे. शतकाच्या पलीकडे जाऊन डोकावण्याचे सामर्थ्य ज्या साहित्यात या लेखकात असेल तेच साहित्य प्रवाह टिकून राहील असे या जागतिकीकरणाच्या साहित्याच्या चर्चेवरील दिसून येते. जागतिकीकरणाची चर्चा ही अनेक माध्यमांच्या अनुषंगाने होते आहे. त्यामध्ये इंटरनेट महाजाल ब्लॉग्स इत्यादी साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो आहे.

संदर्भसूची:

१)जागतिकीकरणा नंतरचे मराठी साहित्य- संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले आणि दत्ता भगत. सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे

२)जागतिकीकरण आणि मराठी साहित्य- संपा.शरद गायकवाड व प्रा.सुनील शिंदे.स्नेहवर्धन प्रकाशन.पुणे.

३)जागतिकीकरण आणि मराठी भाषा – डॉ.सौ.सूर्यकांता अजमेरा, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव.

४)जागतिकीकरण आणि मराठी भाषा- प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर. अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव.

५)जागतिकीकरण आणि मराठी कविता (दीर्घ लेख)- वसंत पाटणकर

आधारभूत ग्रंथ सूची:

१) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या: डॉ.आनंद यादव -मेहता पब्लिकेशन्स, पुणे.

२) ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध: डॉ.नागनाथ कोत्तापल्ले- मेहता पब्लिकेशन्स, पुणे.

३) ग्रामीण कवितेचा इतिहास- डॉ.कैलास सार्वेकर- मेहता पब्लिकेशन्स, पुणे.

संशोधक
पावडे सोपान व्यंकटराव
(एम. ए. मराठी बी.एड. नेट)

मार्गदर्शक
डॉ.श्रीराम गोविंद गव्हाणे
मराठी विभागप्रमुख
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद